# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### नाशिक जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना मदत मिळण्याबाबत

**(१) ३२ (०३-०४-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसाने खरीप तृणधान्य, कडधान्य एकूण १७५९०२ हेक्टर क्षेत्रावरील भात, ज्वारी, बाजरी, नागली व मका तसेच खरीप गळीत धान्य एकूण ४१३१३ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन, भुईमुग व खरीप मुख्यपिके कांदा, द्राक्षे, डाळिंब व इतर भाजीपाला हेक्टर ३०६३५७ क्षेत्रावरील या पिकांचे अतोनात नुकसान झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरामुळे नुकसान झालेल्या घरांचे दोन कोटी ७ लाख रुपयांचे अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून शासनाकडून देण्यात आलेले दोनशे कोटी रुपये बँकांनी वेळेत शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग न केल्यामुळे ३ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, अवकाळी पावसाने पिडीत झालेल्या [शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत व घराची पडझड झालेल्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२४-१२-२०२१) :** (१) खरे आहे,

(२) व (३) खरे नाही,

नाशिक जिल्हयात एकूण बाधित पात्र लाभार्थी ७,१३,५४६ इतक्या शेतकऱ्यांपैकी आज अखरे ६,७५,४८८ शेतकऱ्यांच्या बँकखाती रू.५२८.८७ लक्ष इतके अनुदान वर्ग करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे झालेल्या नुकसानीकरिता रू.७७८.१३ लक्ष इतके अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. तर शासन निर्णय, दि.२१.०९.२०२१ अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांना बारा बलुतेदार, छोटे व्यावसायिक, दुकानदार, टपरीधारक व गोठयांच्या पडझडीसाठी रू.५४५.६८ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देशाच्या तत्कालीन पंतप्रधानांविरुध्द केलेल्या विधानाबाबत**

**(२) ४२० (२०-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुविख्यात गुंड, करीम लाला याला देशाच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी भेटत असत असे बदनामीकारक विधान खासदार श्री.संजय राऊत यांनी एका जाहीर मुलाखतीदरम्यान केल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशाच्या माजी पंतप्रधानांवर गंभीर आरोप करणाऱ्या श्री.राऊत यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (११-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उक्त प्रकरणी खासदार श्री.संजय राऊत यांनी खुलासा करुन त्यांचे वक्तव्य मागे घेतले असल्याचे प्रसिध्द झाले आहे. खासदार श्री.संजय राऊत यांनी वक्तव्य मागे घेतले असल्याने, चौकशी करण्यात आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतील**
**लाभार्थी शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत**

**(३) २१४८ (१८-०४-२०२०). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय शेतकऱ्यांसाठी शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सुरु केली आहे व सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वीज जोडणीसाठी १०,००० रुपये अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजने अंतर्गत २०१७-१८ व २०१८-१९ या दोन वर्षात उमरगा व लोहारा तालुक्यातील ५१ लाभधारकांनी विहिरींची कामे पूर्ण करून विद्युत जोडणीसाठी ऑनलाईन नोंदणी केलेली असूनही सदर लाभार्थ्यांकडून महावितरण कंपनीने डिमांड भरून घेतलेले नाही व विज जोडणीही देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मुख्य अभियंता, लातूर यांना लेखी निवेदन दिले असल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना विज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२०-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजने अंतर्गत वीज जोडणी आकार या बाबीकरिता रु.१०,०००/- इतक्या अनुदानाची रक्कम सामाजिक न्याय विभागामार्फत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते व सदर अनुदानातून महावितरणने वीज जोडणीसाठी आकारलेली मागणीपत्रकाची रक्कम लाभार्थ्यांद्वारे महावितरणकडे जमा केली जाते.

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०१७-१८ व २०१८-१९ अंतर्गत माहे जुलै, २०२० अखेर उमरगा व लोहारा तालुक्यातील एकूण ५२ लाभार्थ्यांनी वीज जोडणीसाठी ऑनलाईन नोंदणी केलेली असून यापैकी महावितरणकडून एकूण १३ लाभार्थीचे डिमांड मंजूर करण्यात आले आहे. यापैकी दोन्ही तालुक्यातील एकूण ०७ लाभार्थ्यांना वीज जोडणी मिळालेली नाही.

(३) हे खरे आहे.

(४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजने अंतर्गत मागणीपत्रक रक्कमेचा भरणा केलेल्या सर्व ०७ लाभार्थ्यांची कामे पूर्ण झाली असून सदर लाभार्थ्यांना विज जोडणी देण्यात आली आहे. उर्वरित ४५ वीज जोडणीकरिता सामाजिक न्याय विभाग, जि.उस्मानाबाद यांच्याकडे निधीची मागणी केली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित कामे प्रस्तावित आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातुर जिल्हयातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) २१५० (०३-०४-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: लातूर जिल्हयातील अपंग व्यक्तींना स्वयंरोजगार बीज भांडवल योजनेंतर्गत समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर यांनी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कर्ज मंजूरीसाठी सादर केलेले प्रस्ताव बँकेकडे प्रलंबित असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दिव्यांग व्यक्तींना वारंवार बँकेत यावे लागत असतांनाही अनेक लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव मंजूर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे आजतागायात किती दिव्यांगानी अर्ज सादर केले असून त्यापैकी किती लाभार्थ्यांना कर्ज मंजुर करण्यात येऊन लाभार्थ्यांचे किती प्रस्ताव शिल्लक आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन या दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी सदर योजनेंतर्गत सुलभ कर्ज उपलब्ध होण्यासाठी तसेच प्रलंबित कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

| वर्ष | एकूण प्राप्त प्रस्ताव | बँकेकडे पाठविलेले प्रस्ताव | बँकेने मंजुर केलेले प्रस्ताव | बँकेकडे प्रलंबित असललेले प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| २०१९-२० | ५३ | ५३ | २० | ३७ |
| एकूण | ५३ | ५३ | २० | ३७ |

(४) सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये ३७ प्रस्ताव संबंधीत बँकांकडे प्रलंबित आहेत. सदरचे प्रस्ताव मंजुर करण्याकरीता मा.जिल्हाधिकारी, लातुर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या लिड बँकेच्या बैठकीमध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगार योजनेचे प्रस्ताव मंजुर करणेकरीता सुचना देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर या कार्यालयाचे पत्र क्र.३४४ दि.०७.०२.२०२० अन्वये प्रलंबित असणारे प्रस्ताव मंजुर करण्यासाठी व्यवस्थापक, अग्रणी बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, औसा रोड, लातुर यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोली औदयोगिक वसाहतीचे अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान

**(५) ३४०५ (०३-०४-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे औदयोगिक वसाहतीमधील छोटया-मोठया उदयोगांची हानी झाली असून औदयोगिक वसाहतीचे १०० कोटी रूपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील पुरस्थिती गंभीर झाल्याने अनेक मार्ग पाण्याखाली गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला, त्यामुळे १५ हजार कामगार पुराच्या पाण्यात अडकल्याने ८ दिवस कामावर हजर होवू शकले नाहीत, परिणामी २ हजार टन कास्टींग उत्पादन थांबल्यामुळे प्रतीदिन दहा कोटी रूपयांचे नुकसान झाले असून त्यामुळे लहान मोठया वाहनांची सुमारे ६० लाख रुपयांची उलाढाल ठप्प झाली, परिणामी करोडो रूपयांचा फटका औदयोगिक वसाहतीला बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार औदयोगिक वसाहतीतील उदयोगांच्या नुकसानग्रस्तांना अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०६-०१-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त अहवालानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून औद्योगिक वसाहतीमधील सुक्ष्म व लघु उद्योगांच्या झालेल्या प्रत्यक्ष नुकसानीचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. यानुसार या औद्योगिक वसाहतीतील सुक्ष्म व लघु उद्योजकांचे रु. ४६ लक्ष इतके आर्थिक नुकसान झाले आहे.

शिरोली औद्योगिक संघटनेकडून प्राप्त दिनांक ११/११/२०२० च्या पत्रानुसार सर्व उद्योजकांचे एकत्रित रु. १,४८,७०,८७०/- इतके नुकसान झालेले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

शिरोली औद्योगिक संघटनेकडून प्राप्त दिनांक ११/११/२०२० च्या पत्रानुसार पूर कालावधीमध्ये साधारणत: १० दिवस औद्योगिक कामकाज बंद होते व यामुळे रु.१५० कोटी आर्थिक उलाढाल ठप्प झाली होती.

(३) व (४) सूक्ष्म व लघू उद्योगांचे पूर कालावधीतील प्रत्यक्ष नुकसानीचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. तथापि नुकसान भरपाई बाबत उद्योजकांमार्फत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यातील मोहसीन ॲग्रो प्रा.लि.कंपनीस दिलेल्या भुखंडाचा गैरवापर केल्याबाबत

**(६) ५७३४ (०३-०४-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये मोहसीन ॲग्रो प्रा.लि. कंपनीच्या नावे भुखंड वितरीत करण्यात आला असून, उक्त कंपनीने भुखंडावर जनावरांचा कत्तलखाना उभारला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड हा चाळीसगांव शहराच्या अगदी जवळ असल्याने भविष्यकाळात या कत्तलखान्यामधून प्रदूषण होऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे, तसेच उक्त जागेवर कत्तलखान्यास चाळीसगाव शहरासह आजूबाजूच्या खडकी बु. व बिलाखेड आदी गावांमधून नागरिकांना मोठ्या प्रमाणात विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरण संवेदनशील व गंभीर असून याची दखल घेऊन सदरहू कत्तलखान्याची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास नाशिक येथील आढावा बैठकीत सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-१२-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि.२७/११/२०१३ रोजीच्या ठरावानुसार फक्त म्हशीचे मास व मास जल उत्पादनासाठी अटी व शर्तीच्या अधीन राहून औद्योगिक क्षेत्राच्या कोप-यात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या अटीवर भूखंड वाटपाचे धोरण अवलंबिले आहे. सदर धोरणास अनुसरून चाळीसगांव औद्योगिक क्षेत्रात मे. मोहसीन ॲग्रो इंडस्ट्रीज यांना भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही,

अशा उद्योगांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे Consent to Establish प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रदुषण झाल्यास जल व वायु प्रदुषण नियंत्रण कायदा व धोकादायक टाकाऊ पदार्थ व्यवस्थापन व हाताळणी नियम, १९९१ अंतर्गत कारवाई करणे शक्य आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या एकात्मिक मांस प्रक्रिया उद्योगास भूखंड वाटपाबाबतच्या दि.२७/११/२०१३ च्या धोरणानुसार मे. मोहसीन ॲग्रो इंडस्ट्रीज यांना भूखंड वाटप करण्यात आला असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात होलार समाज शासनाच्या विविध योजनेच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(७) ७०७२ (०५-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील होलार समाज शासन योजनाच्या लाभापासून वंचित असल्याने होलार समाजाच्या विविध मागण्यासंदर्भात अखिल भारतीय होलार समाज संघटना, मंगळवेढा तालुका यांनी शासनाकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होलार समाजाच्या अडचणी दूर करुन शासनाच्या सोयी-सवलतींचा लाभ मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.रत्नागिरी) येथे मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणात येत असलेल्या बांधकामांचा वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत

**(८) ७२८७ (०९-०४-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) येथील भरणे नाका, भरणे गाव आणि लोटे या परिसरात मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपरीकरणाच्या कामासाठी संपादित केलेल्या जमिनीवर असलेली बांधकामे निष्कासित करण्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आदेश दिले असून सदर संपादित जमिनीवर असलेल्या इमारती, दुकाने अशा ११९ अतिक्रमणाचा वीज पुरवठा खंडीत करण्याचे आदेश महामार्ग बांधकाम विभागाचे सक्षम अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, खेड यांनी दिनांक १७ जानेवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास महावितरणला देऊनही अद्यापि, उक्त अतिक्रमीत बांधकामांचा वीज पुरवठा खंडित केला नसल्याने चौपदरीकरणाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संपादित जमिनीवरील बांधकामांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या सूचनाबाबतचा आदेश दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास यादीसह महावितरणला देऊनही त्यांनी कार्यपुर्ततेचा अहवाल उपविभागीय कार्यालयात सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संपादित जमिनीवरील बांधकामांचा वीज पुरवठा खंडीत करण्यासाठी जाणीवपुर्वक विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२२) :** (१), (२) व (३) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी संपादित केलेल्या जमिनीवरील असलेल्या बांधकामे निष्कासित करण्याचे दि.२८.१२.२०१८ चे पत्र महावितरण कार्यालयास प्राप्त झालेले नाही. तथापि दिनांक १७ जानेवारी,२०१९ चे पत्र खेड विभाग, महावितरण कार्यालयास प्राप्त झाल्यावर त्याअनुषंगाने नॅशनल हायवे विभाग यांचे कंत्राटदार यांनी प्रत्यक्ष इमारती जमीनदोस्त करताना कोणताही

विद्युत अपघात होऊ नये यासाठी वेळोवळी केलेल्या विनंतीनुसार माहे जानेवारी, २०१९ ते आजपर्यंत खेड येथील भरणे नाका, भरणे गांव व लोटे या परिसरात मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदीकरणाच्या कामासाठी संपादित केलेल्या ११९ इमारती, दुकाने व मालमत्तांच्या जमिनीवर एकूण १२९ वीज जोडण्यांपैकी २६ जोडण्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आलेला आहे व १८ जोडण्यांचा वीज पुरवठा स्थलांतरीत करण्यात आलेला आहे. उर्वरित ८५ वीजजोडण्या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या हद्दीबाहेरील असल्याने महामार्गाचे चौपदरीकरणाचे कामात कुठल्याही प्रकारची बाधा निर्माण होत नाही. या संदर्भात महावितरणद्वारे दि.२७.०२.२०२० रोजी संबंधित बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला (ता. हवेली, जि.पुणे) अंतर्गत महावितरण**
**विभागाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(९) ११३७० (१८-०८-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत महावितरण विभागाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जून-२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण विभागाद्वारे सन २०१८ ते माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आलेल्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले त्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२२) :** (१), (२) व (३) महावितरणच्या पर्वती विभागामधील खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत महावितरणची सर्व कामे ई-निविदेद्वारे कामांचा कार्यादेश देऊन करण्यात येतात. तसेच या कामांमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबा उत्पादक शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देण्याबाबत**

**(१०) ११३८८ (१२-०८-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लॉकडाऊनमुळे कोकणातील आंबा बाजारपेठेत उशीरा पोचल्याने शेतमाल विकला गेला नसून आंबा इतर देशात निर्यातही करता आला नसल्याने आंबा उत्पादक शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी ५० टक्के अनुदान जाहिर करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक १ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास वित्त व नियोजन मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आंबा उत्पादक शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) असे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) आंब्याच्या थेट खरेदी-विक्रीसाठी पणन मंडळामार्फत संकेतस्थळ उपलब्ध करुन देण्यात आले. याद्वारे सुमारे ३२५ आंबा उत्पादकांची नोंदणी करण्यात येवुन आंबा उत्पादकाची यादी गृहनिर्माण संस्था, विविध कार्यालये, एन.जी.ओ., वैयक्तिक खरेदीदार यांना उपलब्ध करुन देण्यात आली. यामुळे गृहनिर्माण संस्था, विविध कार्यालये, कृषि विभाग, एन.जी.ओ., वैयक्तिक खरेदीदार यांचेकडून सुमारे ६५,००० डझन आंबा थेट खरेदी करण्यात आला. तसेच आंबा उत्पादकांना पुणे येथे गोडाऊन व वाहन यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे या ठिकाणाहून सुमारे ७००० डझन आंबा वितरीत करण्यात आला. तसेच कोविड-१९ च्या कालावधीत कृषि मालाची निर्यात सुरळीत रहावी तसेच निर्यातदारांना येणाऱ्या अडचणी त्वरीत सोडवून त्यांना मदत व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळांतर्गत वाशी, नवी मुंबई येथे विशेष निर्यात कक्ष स्थापन करण्यात आला होता. त्यामार्फत सन २०२०-२१ मध्ये राज्यातून १९१८४ मे.टन एवढ्या आंब्याची निर्यात झाली आहे. तसेच कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर बाजार समितीतील व्यवहार सुरळीत ठेवण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपंगाच्या मागण्या पुर्ण करण्याबाबत**

**(११) ११६६४ (१४-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका, पंचायत समितीमध्ये अपंग व्यक्तींची नोंदणी करण्यात यावी, अपंगांच्या अपत्यांना के.जी.टू.पी.जी. शिक्षण मोफत मिळावे अशी मागणी अपंग संघटनेकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ५ टक्के रक्कम ही अपंगांच्या कल्याणासाठी खर्च करण्यात यावी अशी मागणी माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने अपंगांच्या मागण्या पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) अ) आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचेकडुन सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व आयुक्त, महानगरपालिका तसेच तहसिलदार, तहसिल कार्यालये यांना त्यांच्या दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात आलेला ५ टक्के निधी खर्च करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

ब) या विभागाकडुन दि.०१.११.२०२० रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, मंत्रालयसमोर, मुंबई येथे राज्यातील सर्व मंत्रालयीन शासकीय विभागाचे मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव/सहसचिव/उप सचिव, तक्रार निवारण अधिकारी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचेकरीता दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कायद्याची जनजागृती व संवेदनशिलता विषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये दिव्यांग कल्याणासाठी सर्व योजनांमध्ये ५ टक्के आरक्षण ठेवणे व स्थानिक स्वराज्य संस्थांचा ५ टक्के निधी राखीव ठेवणे याबाबत चर्चा व मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**लॉकडाऊनमुळे शेतातील भाजीपाला विकला न गेल्याने**
**एकरी १ लाख रुपये आर्थिक मदत देण्याबाबत**

**(१२) ११७९३ (१५-०९-२०२०). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने लॉकडाऊन जाहीर केल्याने भाजी विक्रेत्यांना भाजी विकण्यासाठी कुठेही जाता न आल्याने भाजीपाला शेतात पडून राहिल्याने कुजून गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतातील भाजीपाला विक्री करता आला नसल्याने एकरी १ लाख रुपये आर्थिक मदत देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २८ एप्रिल २०२० रोजी वा त्या सुमारास तथा पालकमंत्री यांनी दिनांक २१ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या बुलडाणा जिल्हा खरीप हंगाम बैठकी दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे जाहीर करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक शेतमालाच्या वाहतूकीत येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी व वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या पुणे येथील मुख्यालयात २४ तास कार्यरत “आंतरराज्यीय फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष” सुरु करण्यात आला होता. सदर वाहतूक नियंत्रण कक्षामार्फत आंतरराज्यीय वाहतूकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीचे निराकरण महसूल यंत्रणा, पोलीस यंत्रणा यांच्याशी संपर्क साधुन करण्यात आले. तसेच जिल्हा

पोलीस नियंत्रण कक्ष तसेच जिल्हानिहाय फळे व भाजीपाला विक्री करणारे शेतकरी, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपनी यांचेशी संपर्क करून राज्यांतर्गत वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली होती.

तसेच बाजार समित्यांच्या सभापती व सचिव यांचेशी संपर्क करुन शेतमाल विक्रीस सहाय्य करण्यात आले.

वाहतूक पासेसबाबत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून e-pass साठी असणारी https://transport.maharashtra.gov.in तसेच पोलीस महासंचालक स्तरावरील www.covid१९.mhpolice.in, www.punepolice.in या यंत्रणाकडून तात्काळ माहिती प्राप्त करून संबंधितांना वाहतूक नियंत्रण कक्षाद्वारे पुरविण्यात येऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यात सहाय्य करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील महावितरणाच्या अनेक विदयुत वाहिनीस न्युट्रल तार नसल्याबाबत**

**(१३) ११८३६ (१५-०९-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील म.रा.वि.वि.कंपनी च्या शेतीपंपा साठी विदयुत पुरवठा होत असलेल्या अनेक विदयुत वाहिनीस चौथी तार (न्युट्रल तार) नसल्याचे माहे मे २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्युट्रल तार असणे हे विदयुत कायद्यानुसार बंधनकारक असतानाही सदरील तार ओढली नसल्याबाबत तातडीने चौकशी करून सदरील चौथी तार नसलेल्या विदयुत वाहिनीस सदर तार ओढण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मुख्य अभियंता म.रा.वि.वि.कं.परिमंडळ कार्यालय लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या जीविताच्या दृष्टीने या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व संबधित दोषीवर कारवाई करण्याबाबत व तातडीने चौथी तार ओढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे. सध्या महावितरणमार्फत शेती पंपाच्या वीज जोडणीचे काम उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे (HVDS) करण्यात येत आहे. या योजनेमध्ये लघुदाब वाहिनी नसल्यामुळे चौथ्या तारेचा न्युट्रल ओढण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(२) हे खरे आहे.
(३) व (४) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशी दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, पूर्वी शेतकऱ्यांना लघुदाब वाहिनीद्वारे तीन तारा फेज म्हणून व एक तार न्युट्रल म्हणून अशा एकूण चार तारा ओढून मीटरद्वारे विद्युत पुरवठा केला जात होता.

ज्या ठिकाणी चौथी तार उपलब्ध नाही व शेतकऱ्यांची तक्रार आहे, अशा ठिकाणी अंदाजपत्रक शाखा अभियंत्याकडून मागवून त्या ठिकाणी न्यूट्रल तार देखभालअंतर्गत नेमलेल्या एजन्सीमार्फत ओढून घेण्याचे निर्देश सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. प्रथम दर्शनी २२ DTC वर २९७ स्पॅनवर न्युट्रल वायर नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने दुरुस्ती व देखभाल अंतर्गत कंत्राटदाराकडून काम करुन घेण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्थेत (बार्टी) विना जाहिरात केलेली पदभरती

**(१४) ११९३८ (१४-०९-२०२०). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय व इतर सामाजिक प्रश्नाबाबत संशोधन करण्यास संधी उपलब्ध करुन अनेक संशोधक निर्माण करणे व घडविणे यासाठी दरवर्षी किमान १०० विद्यार्थांना पूर्णवेळ एम.फिल आणि पीएचडी करण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते परंतू डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास पुणे संस्थेचे महासंचालक यांच्या गैरकारभारमुळे विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीबाबतची परीक्षा दिली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्याप्रमाणात शैक्षणिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थ्यांनी तक्रारी करुनही त्याच्या उक्त तक्रारीची दखल घेतली जात नसल्याने विद्यार्थ्यांनी आत्महत्या करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संस्थेत पदभरती घोटाळा, नियम व निकष डावलून विना जाहिरात घरातील नातेवाईक आणि मित्र मंडळी यांची केलेली भरती, ब्रिक्क कंपनीला कंत्राट देवून आऊट सोर्सिंग करण्यात आले व विजया बँकेत खाते दाखवले असणे, कर्मचाऱ्यांना कागदोपत्री ३५०००/- पगार आहे परंतू प्रत्यक्षात २० ते २५ हजार देण्यात येणे, शैक्षणिक पात्रता डावलून मर्जीतील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे, सरकारी वाहने आणि कर्मचारी घरगुती आणि खाजगी कामाकरिता वापरणे, हितसंबंध असलेल्या कंपनीस टेंडर देऊन त्यांच्या फायली लवकर पास करणे व इतरांच्या फायली लवकर पास केले जात नसणे तसेच बार्टी या संस्थेच्या महासंचालक पद आयएएस दर्जाचे अधिकारी नेमण्याचा नियम असताना आयपीएस अधिकारी यांना महासंचालक पद बहाल केलेले असणे, अशा प्रकारे विविध कामांमध्ये गैरकारभार व अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने उक्त संस्थेच्या विविध कामांमध्ये गैरकारभार व अनियमितता करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२२-१२-२०२१) :** (१) व (२) सन २०१८ पर्यंत ९७५ विद्यार्थ्यांनी बार्टी अंतर्गत विविध अधिछात्रवृत्ती योजनेखाली लाभ घेतलेला आहे, तसेच २०१९ व २०२० साठी एकूण ४०० विद्यार्थी निवडीकरीता लेखी परिक्षेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही चालू आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली तसेच यवतमाळ जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात वॉटर प्युरीफायर खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१५) ११९८९ (१८-०७-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, भामरागड, अहेरी व गडचिरोली तसेच यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा प्रकल्प कार्यालयाने माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जेम पोर्टलवर निविदा देवून आर्थिक फायद्यासाठी कंत्राटदाराशी संगनमत करुन कंपनी दरापेक्षा तिप्पट किंमतीने वॉटर प्युरीफायर खरेदी करुन शासनाचे अंदाजे ६ कोटी रुपयाचे आर्थिक नुकसान केल्याची बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचे दि. ४ मे २०२० च्या परिपत्रकानुसार प्राधान्यक्रम नसलेल्या विभागांना कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मान्यता देता येणार नाही अथवा प्रशासकीय मान्यता प्राप्त असली तरी निविदा करता येणार नाही असे स्पष्ट आदेश असतांनाही शासन निर्णयाकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष करुन निवीदा प्रसिध्द करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, परराज्यातील निविदाधारकांशी संगनमत करुन, महाराष्ट्र राज्यातील निविदाधारकांना तांत्रीक तपासणीमध्ये अपात्र ठरवून भोपाळ, मध्यप्रदेश, दिल्ली येथील कंत्राटदाराच्या ३ निविदा पात्र करुन दिल्लीच्या पुरवठाधारकाला एकूण १४६ नग वॉटर प्युरीफायरचा पुरवठा करण्याचे आदेश दिनांक ३ जून २०२० रोजी वा त्यासुमारास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने निर्देशाचे पालन न करता नियमबाहृय निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यामुळे निविदा प्रकिया रद्द करुन संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-१२-२०२१) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
(४) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली असून त्याबाबतचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औद्योगिक विकास महामंडळ वसाहतीतील भंगार साहित्याची ऑनलाईन निविदा काढण्याबाबत**

**(१६) १२१३३ (२०-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक विकास महामंडळ वसाहतीमधील बहुतांश कंपन्यांमधील भंगार व इतर साहित्यांबाबत ऑनलाईन निविदा निघत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे औद्योगिक वसाहतीत गुंडांची दशहत निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औद्योगिक विकास महामंडळात भंगार साहित्याच्या ऑनलाईन निविदा काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-१२-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेच्या जुन्या/खराब झालेली भंगार सामग्री सक्षम प्राधिका-याच्या मंजुरीने महामंडळामार्फत निर्लेखित करण्यात येतात. सदर निर्लेखित करण्यात आलेल्या भंगार सामग्रीची महामंडळाच्या ऑनलाईन ई-निविदा प्रणालीमार्फत लिलिवाद्वारे विक्री करण्यात येते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात लहान, मध्यम व मोठ्या स्वरुपाचे उद्योग/कंपन्या आहेत. सदर कंपन्यांच्या भंगार व इतर साहित्याची विक्री/विल्हेवाट लावण्याची बाब महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीत येत नाही.

औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांचे व्यवस्थापन संबंधित उद्योजकामार्फत केले जात असल्याने सदर कंपन्यातील भंगार साहित्याची विक्री/विल्हेवाट संबंधित कंपन्यामार्फत केली जाते.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या दुरुस्ती कामात झालेला गैरव्यवहार**

**(१७) १२३७७ (१३-०७-२०२०). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड आणि शिरूर तालुक्यातील (जि.बीड) उच्च दाब वितरण प्रणाली (HDVS)या योजनेअंतर्गत महावितरण कंपनीकडून प्रणाली दुरुस्ती व इतर कामांचे सुमारे ११० कोटी रुपयांचे कंत्राट वोल्टाज पॉवर प्रा.लि. या कंपनीला देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी पंपाचे विद्युतीकरण, ३३ के.व्ही. उप केंद्राची दुरुस्ती, प्रणाली दुरुस्ती व इतर कामे करताना उक्त नमूद कंत्राटदार कंपनीच्या कामाची मुदत पूर्ण होऊनही विहित मुदतीत झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास महावितरण, बीड यांच्याकडे लेखी तक्रार देऊनही दोषीविरुद्ध अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना कृषी पंपाचे विद्युतीकरण करण्यासाठी होणारी पैशांची मागणी, दुरुस्तीच्या कामाकडे होणारा अक्षम्य विलंब या बाबी लक्षात घेऊन कंत्राटदारास प्रशासकीय पातळीवर मदत करणाऱ्या महावितरण कंपनीतील अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२२) :** (१) मे.वोल्टास प्रा.लि. यांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत बीड व शिरुर तालुक्यातील (जि.बीड) कृषीपंपाचे विद्युतीकरण करण्याचे कंत्राट देण्यात आलेले आहे. सदर कंपनीस देण्यात आलेल्या कार्यादेशाची रक्कम बीड व शिरुर तालुक्यातील कामाकरिता अनुक्रमे रु. १३.१४ कोटी व रु. ७.४८ कोटी इतक्या रक्कमेचे कार्यादेश देण्यात आले आहेत. यात फक्त कृषीपंप विद्युतीकरणाचा समावेश असून प्रणाली दुरुस्ती व इतर कामांचा समावेश नाही.

(२) मे.वोल्टास प्रा.लि. यांना देण्यात आलेल्या कंत्राटामध्ये बीड तालुक्यामध्ये ७७० ग्राहकांची कामे प्रस्तावित असून त्यापैकी १३२ ग्राहकांची कृषीपंप विद्युतीकरणाची कामे पूर्ण झालेली आहे व ८५ ग्राहकांची कामे प्रगतीपथावर आहे. तसेच शिरुर तालुक्यामध्ये ४२३ ग्राहकांची कामे प्रस्तावित असून त्यापैकी १६९ ग्राहकांची कामे पूर्ण झालेली आहे व ४९ ग्राहकांची कामे प्रगतीपथावर आहे. या कंत्राटात ३३ के.व्ही. उपकेंद्र दुरुस्ती, प्रणाली दुरुस्ती व इतर कामांचा समावेश नाही. बीड जिल्ह्यांतर्गत ३३ के.व्ही. उपकेंद्राची दुरुस्ती, प्रणाली दुरुस्ती व इतर कामांसाठी एकूण ८६ कंत्राटदारांची ३ वर्षांकरिता नेमणूक करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही. मे.वोल्टास प्रा.लि. यांचेकडून कामात झालेल्या विलंबासाठी दोन वेळा नोटीस टू करेक्ट देण्यात आलेली आहे. मे.योगेश इलेक्ट्रीकल्स, माजलगांव यांनी त्यांना देण्यात आलेल्या ३३ के.व्ही. उपकेंद्राची दुरुस्ती, प्रणाली दुरुस्ती इ. कामांपैकी एकाही कामास सुरुवा न केल्यामुळे त्यांचा कार्यादेश दि.२२.१२.२०२० अन्वये रद्द करण्यात येऊन त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने महात्मा जोतीराव फुले कर्जमुक्ती योजनेतंर्गत कर्जाचे पुनर्गठन न करता नव्याने कर्ज पुरवठा करणेबाबत**

**(१८) १२३८९ (१७-०९-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महात्मा जोतीराव फुले कर्जमुक्ती योजना जाहीर केली परंतु अजूनही सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ न मिळाल्याने नवीन कर्ज मिळत नाही तसेच दुष्काळ, नापिकी आणि कोरोनामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिकट झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा जोतीराव फुले कर्जमाफीचे पैसे खात्यात जमा न झाल्याने कर्ज अजूनही थकीत दिसत आहे. त्यामुळे त्या कर्जाचे पुनर्गठन न करता नव्याने कर्ज पुरवठा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २८ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-१२-२०२१) :** (१) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील १.७४ लाख खातेदारांचे आधार प्रमाणीकरण पुर्ण झालेले आहे. त्यापैकी १.७१ लाख कर्जखात्यावर रु. ११३०.३९ कोटी एवढी रक्कम वितरीत करण्यात आलेली असून उर्वरीत शेतकऱ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) अशा आशयाच्या निवेदनाची नोंद मा. मुख्यमंत्री सचिवालयात आढळत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मातंग समाजाच्या मागण्यांबाबत**

**(१९) १२७३२ (१७-०९-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे सामाजिक संस्था यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन २०१९ मध्ये मातंग समाजाच्या मागण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट असणाऱ्या ३०.२५% टक्के मातंग समाजातील बांधवांच्या आर्थिक व सामाजिक तसेच राजकीय प्रगतीसाठी काही निर्णय घेतले आहेत काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने या समाज बांधवांसाठी निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) मातंग समाजातील बांधवांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने दिनांक ३१ डिसेंबर, २०११ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.
(३) क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशींबाबत संबंधित विभाग/महामंडळे यांच्याकडून कार्यवाही करण्यात येते. सदर विभागांना याप्रकरणी वेळोवेळी कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना शेतीमालाचा हमीभाव व्यापाऱ्यांकडून मिळत नसल्याबाबत**

**(२०) १३२८९ (२०-०९-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांच्या खरीप हंगामातील १४ पिकांसाठी किमान आधारभूत किंमत जाहीर करताना उत्पादन खर्चाचा दीडपटहून अधिक परतावा देण्याचे दिनांक ७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास घोषित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बाजार समित्यांमध्ये आवक झालेल्या शेतीमालाचे हमी भावापेक्षाही दर कमी असुन व्यापारी शेतीमालाच्या हमी भावाने खरेदीचे देयक तयार करुनही शेतकऱ्यांना तेवढे दर देत नसल्याच्या तक्रारी शेतकरी संघटना तसेच संबंधित शेतकऱ्यांनी संबंधित कृषी मंत्री, प्रधान सचिव, पणन विभाग तसेच स्थानिक अधिकारी यांचेकडे वारंवार करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित व्यापारी व बाजार समित्यांमधील अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१३-१२-२०२१) :** (१) होय,
भारत सरकार, कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय (कृषी, सहकरीता एवं किसान कल्याण विभाग) अर्थ सांख्यिकी निर्देशालय यांनी दि.०१.०६.२०२० रोजी सन २०२०-२१ साठी खरीप पिकांसाठी न्यूनतम समर्थन मूल्य (एमएसपी) वाढविण्यास मंजूरी दिलेली आहे. खरीप पिकांच्या एमएसपी दरामध्ये वाढ करण्याच्या भारत सरकारच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामातील १४ पिकांसाठी उत्पादन खर्चाच्या ५०% परतावा देण्याचे जाहीर केलेले आहे.
(२) व (३) नांदुरा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदुरा येथील व्यापारी हे शेतकऱ्यांकडून अत्यल्प दराने शेतमाल खरेदी करीत असल्याच्या तक्रारी केलेल्या होत्या. सदर प्रकरणी तक्रारदार यांचे तक्रारीवर त्यांचे समक्ष म्हणणे ऐकूण घेऊन चौकशी करणेबाबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदुरा यांना कळविण्यात आले असून चौकशीची कार्यवाही सुरू असून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. अमरावती विभाग व्यतिरिक्त इतर कोणत्याही विभागामध्ये शेतीमालाची खरेदी हमीभावापेक्षा कमी दराने होत असल्याबाबत शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील कोरोना विषाणू साथीमुळे बंद पडलेले उद्योग सुरु करण्याबाबत

**(२१) १३५०५ (१७-०९-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना विषाणूच्या साथीमुळे मोठे उद्योग, लघु, सूक्ष्म उद्योगांना आपले कामकाज पूर्णतः बंद ठेवावे लागल्यामुळे असंख्य कामगारांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यातील एकूण किती उद्योगधंदे बंद पडून त्यातील एकूण किती कामगार बेरोजगार झाले आहेत,

(३) असल्यास, वरील पैकी एकूण किती उद्योग आता प्रत्यक्षात सुरु झाले असून त्यापैकी किती बेराजगार कामगारांना पुन्हा नोकरीवर घेण्यात आले आहे,

(४) असल्यास, सदरहू सर्व उद्योग पुन: सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-१२-२०२१) :** (१) कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून, साथ रोग अधिनियम, १८९७ चे कलम (२) तसेच आपत्ती व्यवस्थापन नियम २००५ अंतर्गत संपूर्ण राज्यात टाळेबंदी लावण्याचा निर्णय दिनांक २३ मार्च, २०२० च्या आदेशान्वये राज्यातील अत्यावश्यक सेवा वगळता, उर्वरित सर्व उद्योग, कार्यालये, शिक्षण संस्था, सेवा, इ. दिनांक २५ मार्च, २०२० पासून बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. तसेच टाळेबंदीबाबत दिनांक २५ मार्च, २०२० च्या आदेशान्वये राज्य शासनाने मार्गदर्शक तत्वे निर्गमित करुन टाळेबंदीच्या कालावधीत अत्यावश्यक तसेच वैद्यकीय सेवेशी संबंधित उद्योगधंदे / सेवा वगळता उर्वरित सर्व उद्योगधंदे, शासकीय कार्यालये, शिक्षण संस्था, दुकाने इत्यादी बंद ठेवण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. तद्नंतर पुनश्च: प्रारंभ अभियान अंतर्गत दिनांक ३१ मे, २०२० च्या आदेशान्वये कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करुन, टप्प्याटप्प्याने टाळेबंदीचे निर्बंध शिथिल करणे व उद्योग, कार्यालये, सेवा, इ.मर्यादित कर्मचारी / कामगार यांच्या उपस्थितीत सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. सद्य:स्थितीत सर्व उद्योग, कार्यालये, सेवा, इ. सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे.

(२) राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी एकूण २,३५,८९७ इतके सुक्ष्म, लघु व मध्यम (एमएसएमई) उद्योग बंद ठेवावे लागले होते व त्यामधील कामगारांची एकूण संख्या २२,३७,६५७ इतकी होती.

(३) राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी एकूण २,३५,८९७ सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठे उद्योग घटक लॉकडाऊन काळात बंद होते. राज्यातील कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्याकरीता लॉकडाऊनमुळे बंद असलेले उद्योग सुरु करण्यासाठी कोणत्याही परवानगीची अट ठेवण्यांत आलेली नाही. तथापि कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव विचारात घेऊन, टप्प्याटप्प्याने

मर्यादित कामगार / कर्मचारी यांच्या उपस्थितीत उद्योग सुरु करण्यात आले. सद्य:स्थितीत २,३५,७५७ सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठे उद्योग घटक पुन्हा सुरु झाले आहेत.

(४) उद्योगांच्या आवश्यकतेनुसार कामगार उपलब्ध व्हावेत व नोकरीची गरज असलेल्या उमेदवारांना कोणत्या उद्योगांमध्ये नोकरी उपलब्ध आहे याची माहिती मिळावी यासाठी दिनांक ५ जुलै, २०२० पासून महाजॉब्स हे वेबपोर्टल महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेमार्फत कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर पोर्टल उद्योजक व नोकरी मागणारे उमेदवार यामधील दुवा असून, त्याद्वारे उद्योगांना आवश्यक गरजेनुसार उमेदवार उपलब्ध होण्याची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच एमएसएमई क्षेत्राला आर्थिक उभारी येण्यासाठी भारत सरकारद्वारे आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत विशेष पॅकेज जाहिर करण्यात येऊन घटकांना अधिकचे खेळते भांडवल उपलब्ध होण्यासाठी बँकेद्वारे सहाय्य पुरविण्यात आले आहे.

बंद पडलेल्या / आजारी लघु व मध्यम उद्योग घटकांना पुनर्जिवित करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ अन्वये "विशेष अभय योजना" राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत शासकीय देणींची मुद्दल रक्कम एकरकमी जमा केल्यास, त्यावरील व्याज, दंडव्याज माफ करुन, उद्योग घटकाची स्थिर मालमत्ता अन्य उद्योग घटकाकडे हस्तांतरीत करता येते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनांतर्गत बेरोजगार युवक / युवतींना स्वयंरोजगाराकरीता शासनामार्फत अनुदानित कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तसेच कोविड-१९ पश्चात उद्योग वाढीसाठी राज्यशासनामार्फत "महापरवाना / जलद ना-हरकत परवाने उपलब्ध करणे" जोडा व वापरा (Plug and Play) एकत्रित शोध (Unified Search) लवचिकता प्रस्तावित करणे (Building Resiliency) तसेच गुंतवणूक समन्वयन अधिकारी इ. या बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव, (जि.जळगांव) शहरातील उपरी तारामार्ग भूमिगत करणेबाबत**

**(२२) १४४७२ (१५-०९-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगांव) शहरामध्ये उच्चदाब व लघुदाब वीज वाहन हे उपरी मार्गाने होत आहे. उपरी स्तर मार्गामुळे शहराच्या सुशोभीकरणामध्ये व रस्ते रुंदीकरण यासाठी अनेक ठिकाणी अडचण ठरत आहे तसेच या उपरीस्तर मार्गामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) चाळीसगाव शहरातील उपरी तारामार्ग भूमिगत करण्या करिताचा रु.५७.५६ कोटींचा प्रस्ताव मुख्य सचिव (उर्जा), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे संचालक (प्रकल्प), म.रा.वि.वि.कंपनी मर्या. सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) चाळीसगाव शहरातील उपरी तारामार्ग भूमिगत करणेबाबतचा रु.५७.५६ कोटींचा प्रस्ताव तातडीने मंजूर करून त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२२) :** (१) चाळीसगाव शहरात उच्चदाब व लघुदाब वीज वहन हे पारंपारिक उपरी मार्गाने होत असून, अपघात होऊ नये म्हणून सुरक्षिततेच्या दृष्टीने महावितरण कंपनीकडून योग्य काळजी घेण्यात येते.
(२) व (३) याबाबतचे प्रस्ताव IPDS या योजनेत मान्य झालेला नसल्याने मंजूर झालेले नाहीत. व्यवहार्यता व निधीच्या उपलब्धतनेनुसार ते भविष्यातील योजनेत हाती घेण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोयर पवार या जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र महाराष्ट्र शासनाच्या सामाजीक न्याय विभागाने प्रसिध्द केलेल्या इतर मागास प्रवर्गाच्या अनु.क्र. १८९ नुसार मिळण्याबाबत**

**(२३) १४८४३ (०२-१२-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा व नागपूर जिल्ह्यातील बहुसंख्येने भोयर पवार जातीचे लोक अनेक पिढ्यान पिढ्यांपासून वास्तव्यास आहेत या जातीला भोयर आणि पवार या दोन समानार्थी नावाने ओळखले जाते व ही दोन्ही नावे समानार्थी कागदोपत्री वापरली जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र करित असतांना सन १९६७ सालच्या आधीचा पुरावा मागितला जातो व कोतवाल पंजी व शाळेच्या दाखल्यावर भोयर ही जात अंकित असते, पाल्य व पालकांच्या शाळेच्या दाखल्यावर पवार ही जात नमूद असते, त्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र शासनाचे G.R. संकीर्ण २००८ यादी/प्र.क्र. ५५३/जा. ५ दिनांक २६/०९/२००८ क्रमांकावर पोवार, पवार, भोयर, भोईर, भोयीर असे नमुद आहे. या सर्व जाती एकाच क्रमांकावर असल्यामुळे जात वैधता समिती यास हरकत घेवुन जात प्रमाणपत्र नाकारतात, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, भोयर आणि पवार एकच जात असून पाल्य व पालकांनी जात वैधता प्रमाणपत्राकरिता अर्ज केल्यास जात प्रमाणपत्र देण्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे,
(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०३-०१-२०२२) :** (१), (२) व (३) राज्यातील मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग

(जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व नियम २०१२ यामधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते. जातीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सदर नियम २०१२ च्या नियम ३ व ४ मध्ये तरतुदी विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर तरतुदीस अनुसरुन जात प्रमाणपत्र मागणाऱ्या व्यक्तीने आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता केल्यास जातीचे प्रमाणपत्र मिळण्यास अडचण निर्माण होत नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मानीव दिनांक निश्चित करण्यात आलेला असून सदर मानीव दिनांकास कायमस्वरुपी रहिवास असणाऱ्या अर्जदारास आवश्यक त्या कागदपत्राच्या पुर्ततेनंतर सक्षम प्राधिकारी जातीचे प्रमाणपत्र प्रदान करु शकतो. मानीव दिनाकांनतंर अर्जदाराचा जन्म झाला असल्यास, त्याचे वाड-वडील यांचे मानीव दिनांकास असलेले रहिवासाचे ठिकाण हे अर्जदाराचे कार्यस्वरुपी रहिवासाचे ठिकाण असल्याची तरतुद उपरोक्त नियम २०१२ च्या नियम ३ मध्ये आहे. तसेच महाराष्ट्रामध्ये स्थलांतरीत झालेल्या अर्जदाराच्या बाबतीत त्याचे वाडवडील किंवा नातेवाईक ज्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्रामध्ये मानीव दिनाकांस राहत होते, असा प्राधिकारी जात प्रमाणपत्र देण्यास सक्षम असल्याबाबतची तरतुद उक्त नियम ३ मध्ये आहे.

इतर मागास वर्ग या प्रवर्गासाठी मानीव दिनांक १३/१०/१९६७ असा आहे. त्यामुळे संबंधित जाती प्रवर्गातील व्यक्तींना माहे १३, ऑक्टोबर १९६७ वा त्यापुर्वीचे महसुली पुरावे, व्यवसाय पुरावे देणे आवश्यक आहे.

जात वैधता पडताळणी समिती हे सक्षम प्राधिकारण असुन समितीस अर्धन्यायीक स्वरुपाचे अधिकार आहेत. जातीचा दावा कशा रितीने तपासावा याबाबतचे आदेश अथवा सुचना समितीस देण्याचा अधिकार राज्य शासनास नसल्याचे मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.२८०२/२०१४ यामध्ये दि.४/१२/२०१४ रोजी दिलेल्या निर्णयात सुचित केले आहे.

(४) व (५) शासन निर्णय दिनांक २६/९/२००८ मधील इतर मागास वर्ग मधील अ.क्र.१८९ वर पोवार किंवा पवार (पोवार किंवा पवार आडनावे) भोयर, भोइर, भोयीर असे नमूद आहे व अ.क्र. २२६ वर भोयर ही जात स्वतंत्रपणे नमूद आहे. त्यामुळे इतर मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींनी माहे ऑक्टोबर १९६७ वा त्यापुर्वीचे रहिवासाबाबत महसुली पुरावे, व्यवसाय पुरावे जात प्रमाणपत्र तपासणीसाठी, जात वैधता समितीकडे सादर करणे आवश्यक आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील चाकण औद्योगिक क्षेत्रा टप्पा क्रमांक दोन मधील भूखंड क्रमांक डी ७८ बालकिसन सी मित्तल, मित्तल इंडस्ट्रीज यांना पुर्नवाटप करण्याबाबत**

**(२४) १४८६२ (२८-१०-२०२१). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) तालुक्यातील येथील औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक दोन मधील भूखंड क्रमांक डी ७८ बालकिसन सी मित्तल, मित्तल इंडस्ट्रीज यांनी भूखंड पुर्नवाटपाबाबत विनंती अर्ज शासनाकडे केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड औद्योगिक विकास महामंडळाच्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक चार मधील टाळता न येणारी परिस्थितीवर विचार करून संबंधितांनी भरलेली रक्कम जप्त न करता चालू दराप्रमाणे होणाऱ्या रकमेतून वगळून उर्वरित रक्कम भरून घेण्यात यावी व भूखंड वितरित करावा असे आदेश उद्योग मंत्री यांनी दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही भूखंड वाटपाची कार्यवाही झाली नसल्याने याबाबत मंत्री महोदय यांच्याकडे सततचा पाठपुरावा सुरू असून याप्रकरणी निर्णय लागत नसल्याने या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणे आवश्यक असून शासन या प्रकरणी त्रिसदस्यीय समिती नियुक्त करून याबाबत विलंब करणाऱ्यांवर कारवाई करुन सदरचा भूखंड तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ जून, २०१९ रोजी वा त्या सुमारास उक्त प्रकरणाची संपूर्ण नस्ती मिळणेबाबत प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र दिलेले आहे, परंतु अद्यापही माहिती अप्राप्त असून, या प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) सदर बाब म.औ.वि. महामंडळाच्या अखत्यारीतील आहे. अर्जदार यांनी सूचविल्यानुसार खुली जागा क्र. ओएस-२५ मधून २००० चौ.मी. क्षेत्राचे औद्योगिक क्षेत्रामध्ये रुपांतर करणेकामी म.औ.वि. महामंडळाच्या Minor Modification Committee (MMC) चे मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्तांत अंतिम झाल्यावर भूखंड वाटपाची पुढील कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येईल.
(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या दि. १९/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयाकडे उपलब्ध अहवालाच्या एक प्रतीसह सर्वच आवश्यक माहितीच्या छायांकित प्रत साक्षांकित करुन उपलब्ध देण्याबाबत कळविले आहे. भूखंड वाटपाची कार्यवाही म.औ.वि. महामंडळाच्या स्तरावर करण्यात येते.

त्यानुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून सदर विषयाबाबत प्राप्त झालेल्या पत्रावर म.औ.वि. महामंडळास दि. १५/०६/२०२१ रोजीचे पत्र व दि. १७/११/२०२१ रोजीच्या स्मरणपत्रान्वये नियमोचित कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोना काळात रमाबाई घरकुल, इंदिरा आवास या योजनेंतर्गत निर्माण झालेला अनुशेष भरण्याबाबत

**(२५) २६७७७ (०६-०५-२०२१). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना काळात रमाबाई घरकुल, इंदिरा आवास या योजना अखत्यारीत अनुशेष निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२० ते २०२१ या कालावधीत रमाबाई घरकुल आणि इंदिरा आवास योजना अखत्यारीत जिल्हानिहाय किती वार्षिक अनुशेष निर्माण झाला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अनुशेष भरून काढण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२२-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकमठाण येथील (जि.अहमदनगर, ता.कोपरगाव) ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे काम पूर्ण होणेबाबत**

**(२६) २७११६ (०६-०५-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोकमठाण (जि.अहमदनगर,ता.कोपरगाव) येथे महावितरण कंपनीच्या INFRA योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेल्या उपकेंद्राचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ०.७२ कि.मी. ची ११ के.व्ही.उच्च दाब वाहिनीचे (लिंक लाईन) काम प्रलंबित असल्याने अद्यापर्यंत उपकेंद्राचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने विदयुत निरीक्षक कार्यालयाची परवानगी मिळवून प्रस्तावित उपकेंद्राचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही. मौजे कोकमठाण (जि.अहमदनगर, ता.कोपरगांव) येथे पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही उप केंद्राचे काम पूर्ण करुन कार्यान्वित करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दुर्गापुर (जि.चंद्रपूर) येथील औष्णिक वीज केंद्राला लागलेली आग**

**(२७) २७२९२ (०८-०७-२०२१). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्गापुर (जि.चंद्रपूर) येथील औष्णिक वीज केंद्राला दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास आग लागली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आग लागल्याने वीजनिर्मितीसाठी ठेवण्यात आलेला कोळसा व या केंद्रातील कन्व्हेअर बेल्ट जळून शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने औष्णिक वीज केंद्राला लागलेल्या आगीप्रकरणी संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१६-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) चंद्रपूर महाऔष्णिक केंद्रातील संच क्र. ८ व ९ येथील कोळसा हाताळणी विभागातील कन्व्हेअर बेल्ट येथे आग लागली होती. सदर आगीमध्ये कन्व्हेअर बेल्टचे ७०० मीटर लांबीचे पट्टे जळाल्याने अंदाजे ४.१७ कोटी रुपयाचे नुकसान झाले. सदर घटनेच्या अनुषंगाने कोळसा हाताळणी विभाग ड च्या संचलन उपविभागाचे पाळीप्रमुख कनिष्ठ अभियंता यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच कन्वेअर बेल्टच्या संपुर्ण देखभालीचे काम देण्यात आलेल्या मे. कुणाल एंटरप्रायझेस, नागपूर या कंपनीस शर्तीनुसार रु.४,३७,५८५.६० इतका दंड आकारण्यात आला आहे.

---

**आदिवासी विकास विभागाने कुठलीही निविदा न काढता एनजीओ व अन्य सहकारी संस्था/कंपन्याना कोट्यवधी रुपयांची कंत्राटे दिल्याबाबत**

**(२८) २८००४ (१५-०६-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाने निविदा न काढता एन.जी.ओ., अन्य सहकारी संस्था व कंपन्यांना कोट्यवधी रुपयांची कंत्राट दिल्याचे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंत्राटासाठी लागणारा २५० कोटी रुपयांचा निधी केंद्रीय अर्थसहाय्य योजनेतून देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निविदा न काढता निधी वितरीत करणाऱ्या आदिवासी विकास विभागाच्या सचिव व संबंधित सहकारी संस्था व कंपन्यांच्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-१२-२०२१) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. केंद्र शासनाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत अनुदान, विशेष केंद्रीय सहाय्य व आदिम जमाती विकास कार्यक्रम अंतर्गत योजनांच्या नियोजन व अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शक सुचना निश्चित केल्या आहेत. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प

कार्यालय, शासकीय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी नामवंत संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात येते.

यानुषंगाने सर्व स्तरातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्राथमिक छाननी करून नाविन्यपूर्ण प्रस्तावांची प्राथमिक निवड करण्यात येते.

सदर प्रस्तावाना अंतिम करण्यासाठी अधिका-यांच्या पॅनेल समोर संबंधित यंत्रणा/संस्थांचे सविस्तर सादरीकरण करण्यात येवून प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीची व केंद्र शासनाच्या जन जाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथील Project Appraisal Committee (PAC) यांची मान्यता घेवून प्रस्तावांना केंद्र शासनामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येत असतो.

सदर प्रकल्पांची सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने शासन निर्णय निर्गमित करुन सामंजस्य करार करुन व कार्यादेश देवून अंमलबजावणी करण्यात येते.

सन २०१८-१९ करिता निधी मिळण्यास्तव वरील कार्यपद्धतीचा अवलंब करुन जनजाती कार्यमंत्रालयास प्रस्ताव सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावांत केंद्र शासनाकडून भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सन २०१८-१९ करिता ३ मध्यवर्ती स्वयंपाकगृह प्रकल्प जव्हार, नंदुरबार व घोडेगाव येथे सुरु करण्याच्या रुपये १२.०० कोटी किमतीच्या प्रस्तावास देखील मान्यता प्राप्त झाली आहे. अशा संस्था संदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वस्तुस्थिती तसेच विभागाद्वारे अवलंबिण्यात आलेली कार्यवाही वित्त विभागास सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करण्याबाबत**

**(२९) २९६८५ (१५-०६-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातील कृषी गावठाण आणि पाणीपुरवठा योजनेचे शेकडो ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झालेले असल्याने विद्युत पुरवठा अनेक दिवस बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज बिलाच्या वसुलीसाठी ८० टक्के वीज वसुली झाल्याशिवाय नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर अहवाल सादर करू नये अशा सूचना बुलढाणा वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी दिलेले असल्याने जिल्हाभरातील नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर चा अहवाल सादर होत नसल्याने नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर लवकर दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर तातडीने दुरुस्त करुन देऊन नादुरुस्तीचा अहवाल देऊ नये अशा सूचना देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे केली हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरवर दुरुस्त करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२१/ऊर्जा-५, दिनांक १८.१२.२०२० मधील तरतूदीनुसार नादुरुस्त रोहित्रावरील ८०% ग्राहकांनी त्यांचे चालू बिल भरल्याशिवाय नादुरुस्त रोहित्र बदलण्यात येणार नाही अशा सूचना आहेत.
(३) अश्या आशयाचे पत्र महावितरण कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि.लातुर) तालुक्यात शेतकऱ्यांच्या शेतीपंपास**
**वीज जोडणी मिळत नसल्याबाबत**

**(३०) २९८४१ (१५-०६-२०२१). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातुर) तालुक्यात माहे एप्रिल, २०१८ नंतर आजतागायत शेतातील शेतीपंपाच्या विदयुत जोडणीसाठी शेतकऱ्यांनी अर्जाद्वारे पैसे भरून मागणी केली असतानाही शेती पंपाची जोडणी देणे प्रलंबित असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या लातूर जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत पालकमंत्री लातूर यांच्याकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतातील विहीरी, शेत तळे अश्या विविध स्त्रोतांमार्फत शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असतांनाही केवळ कृषी पंपाना वीज जोडणी मिळाली नसल्याने शेतकऱ्याना शेती करीता पाणी उपलब्ध होत नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे एप्रिल २०१८ ते आजतागायत किती शेतकऱ्यांनी वीज जोडणीसाठी महावितरण कंपनीकडे पैसे भरले आहेत व किती शेतकऱ्यांचे वीज जोडणी प्रलंबित आहे,
(४) असल्यास सदर शेतकऱ्यांना अद्यापही वीज जोडणी न मिळण्याची कारणे काय आहेत व सदरील वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२०-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) शासनाच्या विविध योजनेअंतर्गत कृषीपंप प्रलंबित अर्जदारांना वीज जोडणी देण्यात येत आहे.
(३) औसा तालुक्यातील ०१.०४. २०१८ ते ०६.०८.२०२१ पर्यंत एकूण २३४० अर्जदारांनी कृषी पंपाचे वीज जोडणी करिता पैसै भरलेले आहेत.
(४) महाराष्ट्र शासन ऊर्जा विभाग निर्णय क्र. संकीरण- २०२० / प्र.क्र.१२१ / ऊर्जा-५, दिनांक १८.१२.२०२० या कृषीपंप वीज जोडणी धोरणाअंतर्गत दि. ०१ एप्रिल, २०१८ पासून

पैसे भरुन प्रलंबित असलेल्या अर्जदारांना वीज जोडणी देण्याची प्रक्रिया चालु करण्यात आली आहे. औसा तालुका, जिल्हा लातूर अंतर्गत महावितरण स्तरावर जमा होणाऱ्या कृषी आकस्मिकता निधी (ACF) मधील निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित कृषी पंपांना वीज जोडणी देण्याची कार्यवाही नियोजित असून ३६३ अर्जदारांना वीज जोडणी देण्यात आली असून धोरणातील तरतूदीनुसार उर्वरित अर्जदारांना कृषीपंप अथवा सौर कृषीपंप देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### माढा विधानसभा मतदारसंघामध्ये नवीन सबस्टेशन व ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबत

**(३१) ३१०२८ (०२-०८-२०२१). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा, पंढरपूर, माळशिरस, करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये वीज पुरवठा पुरेशा दाबाने होत नसल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत असून सध्या ६ तासापेक्षा कमी वीज पूरवठा होत असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यात कुर्डू, पिपळनेर, पडसाळी, अरण, वरवडे, एम.आय.डी.सी टेंभुर्णी, तसेच पंढरपूर विभागामध्ये पंढरपूर तालुक्यात बाभुळगांव व मेंढापूर येथे ५ एम.व्ही.ए नवीन ट्रान्सफार्मर बसविणे तसेच लऊळ, निमगांव (टें) ता.माढा, अजनसोंड, रोपळे ता.पंढरपूर व जांभूड, महाळुंग ता.माळशिरस येथे ३३/११ के.व्ही.ची नवीन सबस्टेशन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या वीजे बाबतच्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२२) :** (१) सदर तालुके कृषीबहुल असून, उच्चतम मागणीच्या कालावधी मध्ये, काही वेळेस काही उपकेंद्रे अतिभारित होतात. तथापि, सदर उपकेंद्रातील कॅपॅसीटर बँक कार्यान्वित करुन योग्य दाबाने वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यात येतो. तसेच ३३ के.व्ही. उपकेंद्रातील ज्या अतिभारित फिडरवरुन कमी दाबाने वीज पुरवठा होतो, अशा फिडरवरचा वीज पुरवठा उच्चतम मागणीच्या कालावधीमध्ये सुनियोजित पध्दतीने दोन/तीन भागांमध्ये विभागून टप्प्या टप्प्याने महावितरण कंपनीकडून किमान ६ तासांपासून ते ८ - १० तासांपर्यंत योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यात येतो. इतर कालावधीत कृषीवाहिनीवरील शेतकऱ्यांना धोरणानुसार दिवसा ८ तास व रात्री १० तास चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येतो.

(२) होय, हे खरे आहे.

(३) माढा तालुक्यात कुर्डू, पिंपळनेर व टेंभूर्णी एमआयडीसी उपकेंद्रात अतिरिक्त रोहित्र बसवण्याबाबतचे तीन प्रस्ताव कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत प्रस्तावित करण्यात

आले आहेत. पंढरपूर तालुक्यात मेंढापूर व बाभुळगाव येथील अतिभारीत उपकेंद्रात ५ एम.व्ही.ए. नवीन रोहित्र प्रस्तावित असून तांत्रिक पडताळणीची प्रक्रिया महावितरणच्या मुख्य कार्यालय स्तरावर प्रगतीपथावर आहे. लऊळ, निमगाव (टें) ता. माढा, अजनसोंड, रोपळे ता. पंढरपूर व जांभूड, महाळुंग ता. माळशिरस येथे ३३/११ के.व्ही. नवीन सबस्टेशन करण्यासाठी प्रस्तावांची तांत्रिक पडताळणीची प्रक्रिया क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे. सदर प्रस्तावांची तांत्रिक सुसाध्यता व आर्थिक व्यवहार्यता तपासून निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हा केंद्रीय बँकेमधील थकीत कर्जाच्या वसुलीसाठी प्रयत्न करण्याबाबत

**(३२) ३२२४१ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा केंद्रीय बँकेमधून अनुराधा शुगर मिल ली. वरुड (धाड), महाराज सहकारी सूतगिरणी चिखली मुंगसाजी यांच्याकडे अनुक्रमे २८३७.२८ आणि १२९९.८९ लाख रुपयांची कर्जे घेऊन ती थकविली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही संस्थांनी घेतलेले कर्ज ५० कोटींपेक्षा अधिक असुन कर्जाची वसुली अद्यापपर्यंत न झाल्याने शेतकऱ्यांना कर्जापासुन वंचित राहावे लागत आहे, तसेच बँकचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर थकीत कर्ज वसुली करणे गरजेचे असतांना प्रकरण गत ७-८ वर्षापासून दप्तर दिरंगाईमुळे न्यायालयात प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच कर्ज वसुलीसाठी कोणती कार्यवाही बँकने केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१४-१२-२०२१) :** (१) व (२) अनुराधा शुगर मिल्स लि. वरुड (धाड) व मुंगसाजी महाराज सहकारी सुतगिरणी मर्या. चिखली या संस्थेकडे दिनांक ३१.०३.२०२१ अखेर अनुक्रमे रु. ३०८१.०२ लाख व रु. १३०२.५० लाखाची थकबाकी आहे.
सन २०२०-२१ मध्ये बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने १५२२१ शेतकऱ्यांना रु. ७४८५.३४ लाख (लक्षांकाच्या ११६%) एवढे कर्जवाटप केले आहे.
(३) कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जमाफीच्या दोन्ही योजनांमध्ये पात्र असतानाही कर्जमाफी न झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणेबाबत

**(३३) ३२२४३ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमध्ये लाभार्थ्यांचे अभिलेखे बँकेने उशिरा किंवा अद्ययावत केलेच नसल्याने हजारो शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेमध्ये २०१५ पर्यंत थकीत असलेल्या शेतकऱ्यांनाच लाभ मिळाला असून त्यानंतरच्या थकीत कर्जदारांसाठी महात्मा फुले कर्जमाफी योजना सुरू झाली परंतु छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतून वंचित राहिलेले कर्जदार शेतकरी महात्मा फुले कर्जमाफीत पात्र ठरले नसून महेंद्र नागोराव गवळी रा.आमडापुर ता.चिखली. जि. बुलढाणा हे व असे हजारो शेतकरी बँकांच्या चुकीने कर्जमाफीपासून वंचित राहिले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेचे कर्जमाफी पोर्टल बंद झाल्याने पात्र असूनही कर्जमाफी पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तसेच शासन कर्ज माफी देण्यासाठी सदर योजनेचे पोर्टल सुरू करून वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ द्यावा अशी मागणी श्री.गवळी यांनी दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास व लोकप्रतिनिधी यांनी सहायक निबंधक, बुलढाणा यांना दिनांक २८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या निकषांनुसार पात्र ठरलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या (ग्रीन लिस्ट) शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केल्या आहेत. सदर याद्यांमध्ये waiver, OTS आणि incentive या प्रकारे शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे. तथापी OTS नुसार पात्र घोषित लाभार्थी शेतकऱ्यांनी रु.१.५ लाख वरील रकमेच्या भरणा केलेला नसेल, तर शासन निर्णयामध्ये नमूद निकषांनुसार सदर शेतकऱ्यांना उर्वरीत रकमेचा लाभ देता येत नाही.
(३) व (४) होय. सदरची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मग्नेटिक महाराष्ट्र २ मध्ये विदर्भात एकही उद्योग न आल्याबाबत

**(३४) ३२२४६ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मॅग्नेटिक महाराष्ट्र २ या उपक्रमा अंतर्गत महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत १६ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा दिनांक १५ जून २०२० रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ह्या गुंतवणूकी मध्ये विदर्भात एकही उद्योग घेतला नसल्याने राज्य शासनाने विदर्भाला जाणिवपूर्वक दुर्लक्षित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विदर्भात एकही उद्योग न येण्याची कारणे कोणती आहेत,

(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदर्भातील उद्योगांमध्ये गुंतवणुक करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२०-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) शासनाने सामुहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत विदर्भ/मराठवाडयासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम तसेच मोठया व विशाल प्रकल्पांना आकर्षित करण्यासाठी आणि रोजगार निर्माण करण्यासाठी अतिरिक्त वित्तीय प्रोत्साहने व प्रोत्साहने उपभोगण्यासाठी अधिकचा कालावधी दिलेला आहे. तसेच आर्थिक प्रोत्साहन देण्यासाठी विशेष सवलती दिलेल्या आहेत.

मराठवाडा / विदर्भासाठी रोजगारावर आधारित मोठया, विशेष मोठया, विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांसाठी, किमान गुंतवणुकीची तसेच रोजगार निर्मितीसाठीची किमान मर्यादा राज्याच्या इतर भागांपेक्षा कमी आहे. राज्याचा समतोल औद्योगिक विकास साधने हे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ चे उद्दिष्ट आहे. सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ नुसार माहे जून, २०२० पासून विदर्भातील नागपूर व अमरावती विभागातील MSME आणि Large घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजनेचे फायदे देण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. व त्याव्दारे झालेली गुंतवणुक व रोजगार याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| विभाग/कार्यालय | MSME/ Large /Meg. | पात्रता प्रमाणपत्र दिलेल्या घटकांची संख्या | गुंतवणुक (कोटीत) | रोजगार |
|---|---|---|---|---|
| नागपूर विभाग | MSME | १४२ | ४३४.६४ | ३०२८ |
| | Large | ०३ | ९४.६४ | ५३५ |
| अमरावती | MSME | २०७ | ५३६.४८ | ४७३९ |
| | एकूण | ३५२ | १०६५.७६ | ८३०२ |

उद्योग विभागाकडून नविन उद्योगाकरिता व विस्तारीकरण करीता माहे जून-२०२० नंतर ०८ विशाल प्रकल्पांना देकारपत्र देण्यात आले असून, त्यांची गुंतवणुक रु.३५८४.६५ कोटी इतकी असून, ५२५० इतकी रोजगार क्षमता आहे. तसेच उद्योग संचालनालयाकडून विदर्भातील नागपूर व अमरावती विभागाकरिता माहे जून-२०२० नंतर ०५ मोठे (गुंतवणुक रु.१४८.२९ कोटी व रोजगार ६००) व नागपूर व अमरावती विभागाकरिता माहे जून-२०२० नंतर ०४ विशाल (गुंतवणुक रु.५९७.७१ कोटी व रोजगार ३१८८) प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाव्दारे उद्योग घटकांना नोंदणी करण्याकरिता उद्यमी पोर्टल विकसीत करण्यात आले असून, जुलै, २०२० पासून सप्टेंबर, २०२१ या कालावधीत विदर्भातील नागपूर व अमरावती विभागातंर्गत एकूण १३३२०० (समाविष्ट रोजगार ६६४९५४) इतक्या घटकांची नोंदणी झालेली आहे.

राज्याचा संतुलित औद्योगिक विकास साधण्यासाठी राज्य शासन सर्वोतोपरी प्रयत्नशील असून, विदर्भ/मराठवाडयात गुंतवणुक वाढावी याकरीता विविध बैठका, चर्चासत्रे व कार्यक्रमाव्दारे जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच विदर्भ /मराठवाडयात गुंतवणुक करु इच्छिणाऱ्या गुंतवणुकदारांना सर्वोतोपरी मार्गदर्शक व सहाय्य करण्यासाठी, त्यांचे शंकानिरसन करण्यासाठी विदर्भ व मराठवाडयासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पणन विभागात स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले आहेत. तसेच विदर्भामधील औद्योगिकरणासाठी वाव असणाऱ्या कापड उद्योग, अन्न प्रक्रिया उद्योग व संरक्षण व अवकाश क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी विशेष समर्पित धोरणे आखण्यात आली आहेत. तथापि, प्रकल्प कोठे उभारावा ही बाब सर्वस्वी उद्योजकावर अवलंबून आहे.

(५) लागू नाही

---

**बुलढाणा जिल्हयातील पन्नास पैशाच्या आत आणेवारी**
**आल्याने सुविधा न दिल्याबाबत**

**(३५) ३२२७१ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगामातील बुलढाणा जिल्हयाची सन २०२०-२१ या सुधारित आणेवारी माहे नोव्हेंबर, २०२० रोजीच्या सुमारास जाहिर करण्यात आली असून १३ तालुक्यांची आणेवारी ही पन्नास पैशाच्या आत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील एकूण किती गावांची सुधारित पैसेवारी जाहिर करण्यात आली असून त्यापैकी किती गावांची पैसेवारी ५० पैशांपैकी कमी आहे व किती गावांचे पैसेवारी ५० पैशां पेक्षा जास्त आहे,

(३) असल्यास, तालुक्याची आणेवारी ५० पैशांच्या आता आलेली असतानाही जिल्हयातील कोणत्याही तालुक्यामध्ये दुष्काळाच्या सुविधा देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ज्या तालुक्याची आणेवारी ५० पैसाच्या आत आहे अशा तालुक्यांतील नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१३-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे, खरीप २०२०-२१ हंगामात दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी घोषित करण्यात आलेल्या अंतिम पैसेवारीनुसार, बुलढाणा जिल्हयातील सर्व १३ तालुक्यांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी जाहीर करण्यात आलेली आहे.

(२) खरीप २०२०-२१ हंगामात बुलढाणा जिल्हयातील एकूण १४१९ गावांची पैसेवारी जाहिर करण्यात आली असून सर्व १४१९ गावांची पैसेवारी ५० पैशांपैकी कमी आहे.

(३) खरीप २०१७ हंगामापासून दुष्काळ घोषित करण्यासाठी केंद्र शासनाने लागू केलेल्या दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मधील कार्यपद्धती व निकषांनुसार कार्यवाही केली जात

आहे. पैसेवारीच्या आधारे दुष्काळ घोषित करण्यात येत नाही. त्यामूळे पैसेवारीनुसार सवलती देण्यात येत नाहीत. दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मधील तरतूदी व निकषांनुसार सन २०२० च्या खरीप हंगामात बुलढाणा जिल्हयातील तालुक्यांमध्ये दुष्काळ आढळून आला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयातील NSC न्यू सर्व्हिस कनेक्शनबाबत

**(३६) ३२२९७ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयात न्यू सर्विस कनेक्शन एन एस सी स्कीम मध्ये सन एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ अंतर्गत किती निधी प्राप्त झाला आहे,
(२) असल्यास, सदर निधीमधून तालुका व उपविभाग निहाय विशेषतः चिखली व बुलडाणा तालुक्यात कामे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निधीतुन कोणकोणती कामे करण्यात आली असून कामे करण्यासाठी कोणते निकष लावण्यात आले तसेच कामांचा प्राथम्य क्रम कसा ठरविण्यात आला आहे ?

**डॉ. नितिन राऊत (२०-०१-२०२२) :** (१) बुलढाणा जिल्हयात महावितरणच्या न्यु सर्व्हिस कनेक्शन एन एस सी स्कीम मध्ये रु. ५.०० कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर निधी हा नवीन वीज जोडणीसाठी प्राप्त अर्जदारांसाठी असल्यामुळे नवीन वीज जोडणीसाठी ज्येष्ठता निहाय प्राप्त अर्जानुसार वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या बुलढाणा विभागाअंतर्गत ९५ वीज जोडण्या, खामगाव विभागाअंतर्गत ४४ वीज जोडण्या व मलकापूर विभागाअंतर्गत २४ वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

---

### अनुराधा नागरी सहकारी बँक लिमिटेड चिखली यांनी कर्जवाटपात केलेला गैरव्यवहार

**(३७) ३२३२१ (१५-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुराधा नागरी सहकारी बँक लिमिटेड, चिखली जिल्हा बुलढाणा यांच्या सन २००६-०७ व २००७-०८ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षण अहवालामध्ये ८ लक्ष ५४ हजार रुपये एवढीच कृषी कर्जाची थकबाकी दाखवलेली असताना त्यांनी राज्य शासनाकडून ६६ लक्ष ५४ हजार व केंद्र शासनाकडून १ कोटी ६८ लक्ष असे एकूण २ कोटी ३४ लाख ५४ हजार रुपयांचा निधी शासनाकडून घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुराधा अर्बन बँकेने ८.५४ लाखाची थकबाकी असतांना खोटे थकबाकीदार शेतकरी दाखवून अतिरिक्त २ कोटी २६ लक्ष रुपये राज्य व केंद्र सरकारकडून घेऊन शासकीय निधीचा अपहार केला असल्याचेही शासनाने मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अनुराधा अर्बन बँकेच्या व्यवस्थापनाकडून अपहार केलेल्या रकमेची दंडनीय व्याजासहित वसुली साठी आणि व्यवस्थापनावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-१२-२०२१) :** (१) होय.
(२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने दिनांक २५.११.२०२० रोजीच्या अहवालात अनुराधा नागरी सहकारी बँक लि. चिखली, जि. बुलडाणा या बँकेच्या सन २००७-२००८ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये कृषी कर्ज रक्कम रु. ८ लाख ५४ हजार रुपये एवढी दर्शविण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात सदर बँकेला कर्जमाफी योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून ४५५ सभासदांचे रु. ६६,९४,१३१/- व केंद्र शासनाकडून १२६७ सभासदांचे रु. १,६८,१५,५८४/- असे दोन्ही कर्जमाफी योजनेअंतर्गत १७२२ सभासदांचे एकूण २,३५,०९,७१५/- रुपये इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. त्यानुसार लेखापरिक्षण अहवालातील कृषीकर्ज रक्कम व प्रत्यक्ष कर्जमाफीचा लाभ यामध्ये विसंगती दिसून येत आहे.
सदर विसंगतीच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालया मार्फत चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय चौकशी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून त्याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचा अहवाल मागविण्यात आला आहे.
(३) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आरोग्य विभागात गट “क” आणि “ड” संवर्गाच्या पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परिक्षेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३८) ३२६३२ (२३-११-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व):** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यातील आरोग्य विभागात दि. २५ आणि २६ सप्टेंबर २०२१ रोजी गट “क” आणि “ड” संवर्गाच्या पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परिक्षेसाठी नेमणूक करण्यात आलेल्या न्यास

कम्युनिकेशन प्रायव्हेट लि. (एम.सी.पी.एल.) या खाजगी कंपनीने परिक्षा केंद्रावर पुरेशी व्यवस्था न केल्याने सदर परिक्षा रद्द करावी लागली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरती प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार तसेच काही परिक्षार्थींना प्राप्त झालेले हॉल तिकेटावर उत्तर प्रदेश मधील केंद्र दिले अश्या बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, तद्नंतर नाशिक, पुणे, नागपूर व इतर ठिकाणी दि.२४.१०.२०२१ रोजी घेण्यात आलेल्या आरोग्य विभागातील गट क व ड या संवर्गातील विविध पदांच्या भरती प्रक्रियेच्या वेळी परिक्षांमध्ये अपु-या संख्येने उत्तरपत्रिका देणे, परिक्षा टेलिफोन ऑपरेटरची पण प्रश्नपत्रिका प्लंबर किंवा चालकपदाची तसेच केंद्र संचालकांची अनुपस्थिती असणे इत्यादी अनेक त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्सास, त्यानुसार परिक्षेसाठी नेमणूक करण्यात आलेल्या न्यास कम्युनिकेशन प्रायव्हेट लि. (एम.सी.पी.एल.) या खाजगी कंपनीवर कारवाई करणेसह परिक्षा रद्द किंवा पूढे ढकलल्यामुळे परिक्षार्थींना झालेले आर्थिक नुकसान भरपाई देणेसह परिक्षा सुनियोजित आयोजित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२३-१२-२०२१) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

काही परिक्षार्थींना प्राप्त झालेले हॉल तिकेटावर उत्तर प्रदश मधील केंद्र दिल्याचे निदर्शनास आल्यावर मे.न्यास कंपनीने हॉल तिकेटावरील केंद्र बदलून दिले. तसेच भरती प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहाराबाबत झाला किंवा कसे याबाबत पोलिस तपास सुरू आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

दि.२४.१०.२०२१ रोजी झालेल्या गट-क संवर्गाच्या परिक्षेत खलील बाबी निदर्शनास आल्या आहेत:-

१. नाशिक येथील गिरणारे परिक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका उशीराने पोहोचल्या.
२. लातूर येथील शिवाजी माध्यमिक शाळेच्या केंद्रावर दूरध्वनीचालक पदाच्या प्रश्नपत्रिकेऐवजी दुसऱ्या पदाच्या प्रश्नपत्रिका देण्यात आल्या होत्या. अशा उमेदवारांची दि.२८.११.२०२१ रोजी पुर्नपरिक्षा घेण्यात आली आहे.
३. पुणे येथील आबेदा इनामदार परिक्षा केंद्रात समवेक्षक उपस्थित न झाल्याने विभागाकडील समवेक्षक यांचेकडून परिक्षा पार पाडण्यात आली आहे.
४. पुणे येथील गितमाला परिक्षा केंद्रावर उमेदवारांना अवैद्यकीय सहायक पदाच्या प्रश्नपत्रिकेऐवजी इतर पदाचे प्रश्नपत्रिका देण्यात आले होते. तसेच अमरावती येथे देखील कनिष्ठ लिपिक पदाच्या प्रश्नपत्रिकेऐवजी इतर पदाचे प्रश्नपत्रिका देण्यात आले होते. अशा उमेदवारांची दि.२८.११.२०२१ रोजी पुर्नपरिक्षा घेण्यात आली आहे.
५. गट-ड पदांची दि.३१.१०.२०२१ रोजी झालेल्या परिक्षेचे प्रश्नपत्रिका फुटल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या तक्रारीच्या अनुषंगाने पुणे शहर सायबर सेल

यांचेकडे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व त्यानअुषंगाने त्या विभागाकडून याबाबतचा तपास सुरू आहे.

(४) होय.

(५) मे. न्यास कंपनीकडून परीक्षा नियोजनाबाबत हलगर्जीपणा झाल्याने आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्याकडून कंपनीला संबंधीत कारणासाठी वेळोवळी नोटीस बजावण्यात आलेल्या आहे. परिक्षा सुनियोजन करण्यासाठी विभागाकडून दि.०६.१०.२०२१ पासून दररोज दिनांक २४.१०.२०२१ पर्यंत परिक्षा पुर्वतयारीचा आढावा घेण्यात आलेला होता. विभागाकडून मे.न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. यांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात आले आहेत. विभागाकडून पोलीस बंदोबस्त, स्ट्रॉंग/सुरक्षा खोली व्यवस्था, जॅमर्स व्यवस्था, परिक्षा केंद्रांची पाहणी करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सहकारी साखर कारखाने थकीत कर्जाच्या वसुलीसाठी भाडेतत्वावर चालवायला देण्याबाबत**

**(३९) ३२९३३ (१२-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२ सहकारी साखर कारखाने थकीत कर्जाच्या वसुलीसाठी भाडेतत्वावर चालवायला देण्याचा निर्णय राष्ट्रीयकृत बॅंकेने घेतला असल्याचे ३१ ऑगस्ट, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारखाने भाडेतत्वावर चालवायला देण्याच्या नावाखाली त्यांचे खासगीकरण होत असल्याचा आरोप होत असून राष्ट्रीयकृत बॅंकेने साखर कारखाने भाडेतत्वावर चालवायला देण्याचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कारखान्यांचे पुनर्वसन करावे अशी मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी आहे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-०२-२०२२) :** (१) होय हे अंशतः खरे आहे.

सदरचा निर्णय राष्ट्रीयकृत बॅंकेने घेतला नसून महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक लि., मुंबई यांनी दि.०५.०८.२०२१ रोजी वर्तमानपत्रात १२ सहकारी साखर कारखाने व ०१ सूतगिरणी भाडेतत्वावर देण्याबाबत जाहिरात दिली होती.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. असा कोणताही प्रस्ताव सहकार विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कृषी पंपाची**
**वीज जोडणी तोडल्याबाबत**

**(४०) ३४९८२ (२५-११-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील सुमारे ५ हजार शेतकऱ्यांच्या कृषी पंपाची विज जोडणी थकबाकी असल्याच्या कारणास्तव महावितरणने तोडली असल्याने शेतकरी आर्थिक संकटात असल्याची बाब दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गहू, हरभरा, संत्री, मोसंबी या पिकांसाठी पाणी सिंचनाची नितांत आवश्यकता असतानाच वीज जोडणी तोडण्यात आल्याने पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे पाण्याच्या सिंचनाअभावी होणारे नुकसान टाळण्यासाठी त्यांच्या कृषी पंपाची तोडलेली वीज जोडणी पुनश्च जोडून देण्याबाबत, तसेच थकीत वीज देयकांच्या रकमेच्या वसुलीत सवलत देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

नागपूर जिल्हयाअंतर्गत ९५३८१ कृषी ग्राहकांची रु. ५७०.३२ कोटी रुपयांची थकबाकी असून त्यापैकी चालु वीजबिल न भरणाऱ्या २३४४ ग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला आहे.

(३) कृषी ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी शासनाने सर्वसमावेषक “कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०” जाहीर केले आहे. हया धोरण अंतर्गत सुधारित थकबाकी रक्कमेवर पहिल्या वर्षी ५०% पर्यंतची सूट ग्राहकांना देण्यात येत असून देय रक्कम टप्प्या टप्प्याने भरणा करण्याची देखील सुविधा देण्यात येत आहे. अशाप्रकारे जमा होणाऱ्या महसूलापैकी ६६% निधी हा त्या जिल्हयातील वीजेच्या पायाभूत सुविधांकरीता वापरण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(४१) ३५१९७ (१८-११-२०२१). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी, दुर्गम व नक्षलग्रस्त अश्या गडचिरोली जिल्हयात नक्षली कारवाईमध्ये गंभीर जखमी होणारे पोलीस जवान तसेच गंभीर आजारांचा सामना करणारे गरीब आदिवासी नागरीकांना सर्व सोयी-सुविधायुक्त वैद्यकीय उपचारापासून वंचीत रहावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहील्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आलेली आहे, हे खरे अहे काय,

(२) असल्यास, या भागात आरोग्य सुविधेचा अभाव लक्षात घेवुन शासनाने गडचिरोली येथे अदययावत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार गडचिरोली येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करण्यसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२०-१२-२०२१) :** (१) होय हे अंशतः खरे आहे.
विविध लोकप्रतिनिधींमार्फत सदर बाबीची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.
(२) व (३) होय हे खरे आहे.
जिल्हा गडचिरोली येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर विविध विभागांचे अभिप्राय घेऊन मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) विधानसभा क्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्या कामाकरिता निधी उपलब्ध होण्याबाबत

**(४२) ३५९७७ (१०-०१-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) विधानसभा क्षेत्रात रोजगार हमी योजनेच्या कामांना मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत नगरपंचायत यांनी शासनाच्या नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त क्षेत्रातील नगरपंचायतच्या कामांच्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत वेगवेगळ्या विभागाकडून अडथळे व अनावश्यक विलंब टाळण्याकरिता कामांच्या पद्धती सुधारुन सुलभरितीने ठरविण्याचे शासनाचे धोरण असताना कामांना मंजूरी व निधी उपलब्ध न झाल्याने नगरपंचायत क्षेत्रातील नागरिकांना बेरोजगार भत्ता देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०३-०२-२०२२) :** (१) हे अंशतः खरे आहे.
प्रस्तावासोबत संचालक, नगर परिषद संचालनालय यांच्या मान्यतेची प्रत व कुशल खर्चाच्या २५ टक्के रक्कम नगरपंचायत अर्जुनी/मोरगांव खर्च करण्यास तयार असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध नसल्याने प्रस्ताव अपूर्ण आहे.
(२) हे खरे नाही.
(३) दिनांक ०३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये “क” वर्ग नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रात राज्य रोहयोची राज्यात अंमलबजावणी करणेबाबतच्या तरतूदी विहीत केलेल्या आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद ३ (ii) मध्ये वित्तीय वर्षाचा आराखडा विभागीय आयुक्तांमार्फत संचालक नगरपरिषद / नगरपंचायत यांना सादर करतील, अशी तरतूद होती.

विभागीय आयुक्त कार्यालयाचा या प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग नसल्यामुळे प्रकरणे मंजूर होण्यास अकारण कालापव्यय होत होता. त्यामुळे शासन शुद्धीपत्रक दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपरोक्त शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सुधारित कार्यपध्दतीनुसार जिल्हाधिकारी जिल्ह्यातील अंगमेहनतीच्या अकुशल कामासाठी कामाचा अपेक्षित मागणीचा तपशील आणि किती रोजगार पुरविता येईल याबाबत तपशीलवार योजना असणारा पुढील वित्तीय वर्षाचा मजुर आराखडा प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर महिन्यात तयार करतील व संचालक, नगर परिषद / नगर पंचायत यांना सादर करतील, असे विहीत करण्यात आले आहे.

सदर कार्यपध्दतीनुसार जिल्हाधिकारी, गोंदिया कार्यालयाकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त होताच या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबादच्या 'संबोधी' स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राला नियमबाह्यरित्या राज्य सेवा परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी सलग पाच वर्षांसाठी मान्यता दिल्याबाबत

**(४३) ३६०६१ (२५-११-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (बार्टी) औरंगाबादच्या 'संबोधी' स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राला दरवर्षीच्या निकालाची टक्केवारी न तपासता राज्य सेवा परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी पहिल्यांदाच सलग पाच वर्षांसाठी मान्यता देण्याचा प्रकार दिनांक ९ नोहेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी 'बार्टी'चे अधिकार डावलण्यात आले असून २४ कोटी दहा लाख रुपयांचा प्रशिक्षण कार्यक्रम 'संबोधी' ला बहाल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि 'संबोधी' स्पर्धा प्रशिक्षण केंद्रास नियमबाह्यरित्या देण्यात आलेली मान्यता रद्द करून 'बार्टी' च्या मार्फत अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देण्यासाठी फेरनिविदा प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२२-१२-२०२१) :** (१) व (२) शासन निर्णय दि.२८.१०.२०२१ अन्वये संबोधी स्पर्धा प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद यांच्या राज्यसेवा परिक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमास डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे(बार्टी) मार्फत ५ वर्ष चालू ठेवण्यास बार्टीच्या Rules and Regulations मधील शासनाच्या अधिकारितेनुसारच मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी येथील जातपडताळणी कार्यालयात अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) ३६१५६ (३०-११-२०२१). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्यात जात पडताळणी कार्यालयात तब्बल १,४८४ अर्ज प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नियमानुसार विविध विभाग, प्राधिकरण व पदावर आरक्षित अशा विशिष्ट प्रवर्गात नोकरी मिळविण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत आरक्षित जागावर निवडणूक लढवण्यासाठी आणि विशेष म्हणजे महाविद्यालयात आरक्षित जागेवर प्रवेश मिळवण्यासाठी जातीचा दाखला व जातपडताळणी आवश्यक आहे हे माहिती असतांनाही जातपडताळणी कार्यालयात अर्ज प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्‌यार्थ्यांना जातपडताळणी दाखला वेळेत उपलब्ध होत नसल्याने हजारो विद्‌यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, जातपडताळणी अर्ज तातडीने निकाली काढण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. धनंजय मुंडे (१०-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रत्नागिरी या समितीकडे मागील ४ महिन्यांत एकूण १३६४ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी त्रुटीचे अर्ज मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यातही बहुतांश विद्‌यार्थ्यांनी इ.१२ वी चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या कार्यालयाकडे अर्ज दाखल केले आहेत, म्हणुन वेळेत निपटारा होणे शक्य होत नाही. तरी जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

तथापी जात प्रमाणपत्र पडताळणी अभावी शैक्षणिक नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रलंबित प्रकरणांबाबत प्रतिमाह आढावा बैठक घेऊन सदर प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी रहिवासी दाखला मिळण्याच्या निकषात बदल करण्याबाबत**

**(४५) ३६२०३ (१२-०१-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निराधार, वृद्ध व्यक्ती, अंध, अपंग, विधवा महिलांना अर्थसहाय्य देण्याच्या मूळ हेतूने संजय गांधी निराधार अनुदान योजना राबविण्यात येत असून योजनेचा लाभ मिळविण्यासाठी नागरिकांना १५ वर्षे महाराष्ट्रातील वास्तव्य असलेला रहिवासी दाखला आवश्यक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक महिला भगिनी या परराज्यातून लग्न करून महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या असल्याने अनेक अकाली विधवा महिलांना राज्यात १५ वर्षे वास्तव्यास नसल्याने रहिवासी दाखला मिळत नसल्याने त्यांना सदर योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ नागरिकांना मिळण्यासाठी योजनेच्या आवश्यक कागदपत्रांमधील सदर महिलांच्या 'रहिवासी दाखला' काढण्याच्या नियमात बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (३१-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) विधवा महिलांकरिता (इतर राज्यातून लग्न होऊन आलेल्या) किमान १५ वर्ष महाराष्ट्र राज्यात रहिवासी असल्याची अट शिथिल करण्यात आली असून सदर महिलेचा पती हा किमान १५ वर्ष महाराष्ट्र राज्यात रहिवासी असणे अनिवार्य राहील अशी सुधारणा विभागाच्या दिनांक ३ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील रमाई आवास योजनेबाबत**

**(४६) ३६२५२ (२५-११-२०२१). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत रमाई आवास योजनेंतर्गत १२ हजार ३४५ घरकुल मंजूर करण्यात आले आहेत त्यापैकी ५ हजार ६६० घरकुले पूर्ण झाली आहेत तथापि ६ हजार ६२५ लाभार्थी घरकुलापासून वंचित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन २०२०-२१ या कालावधीत रमाई आवास योजना (ग्रामीण) याकरीता ५० कोटी रूपयांचा निधी विभागाला उपलब्ध करुन दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरकुल मंजूर होवूनही काही लाभार्थ्यांनी प्रथम अथवा व्दितीय हप्त्याची रक्कम उचलली नसल्याने घरकुलांचे बांधकाम रखडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी घरकुल लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२२-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर (जि. जळगांव) येथे अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(४७) ३६३९२ (२५-११-२०२१). श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे व फळपिकांचे अतोनात नुकसान झाले असून अद्यापपर्यंत २ वर्षे होऊनही अमळनेर तालुक्यातील ३२ गावांतील बाधित शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळालेली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी बाधित शेतपिकांच्या व फळपिकाच्या झालेल्या नुकसानीबाबतचा प्रस्ताव तहसिलदार, अमळनेर जि. जळगांव यांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे सादर केला असल्याचेही निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, अमळनेर तालुक्यातील या ३२ गावांतील शेतकऱ्यांना पीक व फळबाग नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मदत व पुनर्वसन मंत्री, विभागीय आयुक्त, नाशिक व तहसिलदार, अमळनेर (जि. जळगांव) यांना दिनांक २६ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन अमळनेर तालुक्यातील ३२ नुकसानग्रस्त गावांतील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१६-१२-२०२१) :** (१) खरे आहे,
(२) खरे आहे,
(३) खरे आहे,
(४) मा. लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने अमळनेर तालुकयातील ३२ गावांतील शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबतचा प्रस्ताव मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.२७.०७.२०२१ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. मंत्रीमंडळ उपसमितीने सदरचा प्रस्ताव अमान्य केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उप प्रादेशिक कार्यालय मोखाडा अंतर्गत सन २०१४ - २०१५ मध्ये आधारभूत खरेदी केंद्रात भात खरेदी प्रक्रिया मध्ये झालेली अनियमितता**

**(४८) ३६४४६ (२५-११-२०२१). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उप प्रादेशिक कार्यालय, मोखाडा अंतर्गत सन २०१४ - २०१५ मध्ये आधारभूत खरेदी केंद्र १) कळंभे २) खैरे - आंबिवली ३) सोनाळे येथील बोगस भात खरेदी प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमिततेबद्दल चौकशी करुन दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्या. कार्यालय यांच्याकडे लेखी निवेदन देऊन मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रादेशिक व्यवस्थापक यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास चौकशी करून अहवाल सादर करण्याचे उप व्यवस्थापक, उप प्रादेशिक कार्यालय, जव्हार यांना निर्देश दिले, हे ही खरे आहे,

(३) उक्त प्रकरणी उप व्यवस्थापक, उप प्रादेशिक कार्यालय, जव्हार यांनी चौकशी करुन अहवाल सादर केला आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्याने चौकशी प्रलंबित होती.तदनंतर, चौकशी अधिकारी श्री.बोरोले हे दि.२४/०८/२०२१ पासून निलंबीत असल्याने सदरची चौकशी प्रलंबीत आहे. नव्याने चौकशी अधिकारी नियुक्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील बँकांना पीक कर्ज वाटपाचे उद्दीष्ट दिल्याबाबत**

**(४९) ३६८४८ (१२-०१-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात सन २०२१-२२ वर्षाकरीता बँकांना १२१३ कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटपाचे उद्दीष्ट दिलेले असतांना माहे ऑगस्ट, २०२१ अखेर केवळ ५२१ कोटी रुपयांचे पीक कर्ज वितरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात एकुण ३ लाखाहून अधिक शेतकरी पीक कर्जाचे लाभार्थी असतांना केवळ ८२ हजार शेतकऱ्यांनाच पीक कर्जाचे वाटप झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यातील लाखो शेतकरी पीक कर्जापासून वंचित असून बँकाना पीक कर्ज वाटपासाठी दिलेल्या उद्दीष्टाच्या अनुषंगाने उर्वरीत शेतकऱ्यांना तातडीने पीक कर्ज वितरीत होण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (११-०२-२०२२) :** (१) व (२) परभणी जिल्ह्यात सन 2021-22 या वर्षातील खरीप हंगामासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परभणी, व्यापारी व खाजगी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकांसाठी एकुण रु.१२१३.२१ कोटी इतका पीक कर्जवाटपाचा लक्षांक होता. त्यानुसार सदरील बँकांनी १,०६,९२२ शेतकऱ्यांना रु.७४८.८० कोटी पीककर्ज वाटप केले आहे.
(३) परभणी जिल्ह्यातील पीककर्ज वाटपासाठी दिलेल्या उद्दीष्टाच्या अनुषंगाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परभणी, व्यापारी व खाजगी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकांना लक्षांक पूर्ण करण्याबाबत व पात्र शेतकरी कर्जापासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखालील सभांद्वारे वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यात दुसऱ्या राज्यातून स्थायिक झालेल्या एस.सी., एस.टी, एन.टी. व ओ.बी.सी. प्रवर्गातील नागरिकांच्या जात प्रमाणपत्राबाबत**

**(५०) ३६८८९ (१२-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुसऱ्या राज्यातून स्थायिक झालेल्या एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील लोकांना १९५१ च्या पूर्वीचा शासन पुरावा दिला असता जात प्रमाणपत्रासाठी पात्र ठरतात तसेच एन.टी. साठी १९६१ पूर्वीचा पुरावा व ओ.बी.सी. साठी १९६७ पूर्वीचे प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रमाणपत्र मिळत नसल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रवर्गातील नागरिकांना जात प्रमाणपत्र देण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या कागदपत्रांचा कालावधी कमी करण्यात येण्याची मागणी संबंधित विभागांना करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. धनंजय मुंडे (०९-०२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

जातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरिता “सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३” अंतर्गत दि. १ सप्टेंबर, २०१२ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ विहित करण्यात आले आहेत. नियम, २०१२ मधील नियम 2(ड) नुसार मानीव दिनांकाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

नियम-२०१२ मधील नियम क्र.६ नुसार स्थलांतरित व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत तरतूद असून नियम ६ (ग) नुसार महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत व्यक्ती त्याच्या मूळ राज्यातून किंवा केंद्र सरकारकडून लाभ मिळण्यास हक्कदार असेल, मात्र महाराष्ट्र राज्याकडून त्याला आरक्षणाचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.